**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,**
३०२,वेक फिल्ड हाऊस,३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई४०० ००१.
दूरध्वनी क्र.२२६१४९८४/८५,Email:ccfmmumbai@gmail.com/dcfmangrovecell@gmail.com/konkanmangroves@gmail.com

**विषय**:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/ल.ले/ ४४ /सन २०१९-२०
फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक: २४/०७/२०१९

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक, पर्यावरण विभाग.
६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
७. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबिविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची **२४** वी बैठक दिनांक **२९/०६/२०१९** रोजी मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई येथे घेण्यात आली.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने इतिवृत्तातील सूचनेप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन कांदळवन तक्रारींबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी या कार्यालयात सादर करावा, ही विनंती.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

## कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची २४ वी मासिक बैठक दि.२९/०६/२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

| अ. क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | श्री. नंदकुमार पवार<br>1) Dastan phata jasai, where almost 100 acres of wetland is reclaimed, Reclamation still continue. | • या तक्रारी संदर्भात SDO पनवेल यांनी दस्तान फाटा शिवस्मारकाचे काम चालू होते ते पूर्ण झाले असून पाणथळ असलेल्या १३१ जागेची यादी नुसार दस्तान फाटा हे क्षेत्र पाणथळ नसल्याचे त्यांनी सांगितले.<br>• उर्वरीत उरण येथील पाणथळाचे संरक्षण करण्यासाठी १३१ जागेची माहिती समितीस तहसिलदार उरण यांना दिलेली आहे. त्यानुसार १३१ पाणथळ जागेचे संरक्षण करण्याचे आदेश जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी रायगड व तहसिलदार उरण |
| २ | श्री. सुनिल अगरवाल<br>Destruction of Uran wetlands & Mangroves - Dastaan Node. | | |
| ३ | श्री. धिरज परब:- पालघर जिल्हयातील वसई तालुक्यात वरसावे पूल महामार्गापासून लोढा जैन मंदिर पर्यंतच्या परिसरात कांदळवन, पाणथळचा नाश करुन,सीआरझेड,इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये चाललेल्या प्रचंड भराव- बांधकामा प्रकरणी. | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार वसई यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेवर डेब्रिज भराव करण्याऱ्या ३१ वाहने जप्त करण्यात आलेली आहेत.<br>• तसेच जिल्हाधिकारी पालघर यांच्या दि.२८.०६.२०१९ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार पालघर जिल्हयातील वरसावे पुल महामार्गापासून लोढा जैन मंदिरापर्यंतच्या परिसरात जमिनीवर भराव होऊन कांदळवनाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्याने प्रकरणी संबंधीतांवर पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम अन्वये पोलीस स्टेशन वालीव येथे दि. १६.०३.२०१९ रोजी गुन्हा रजि. नं. ०२४२/२०१९ अन्वये दाखल करणेत आलेला आहे.<br>• सदर जागेवरील भराव काढण्यासाठी समितीने उपस्थित | तहसिलदार वसई (जिल्हाधिकारी पालघर) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सहा. आयुक्त वसई-विरार महानगरपालिका यांना दिल्या व सदर जागेचे Restoration करण्याची कार्यवाही करण्याकरीता लागणाऱ्या अनुदानाची शासनाकडून मागणी करावी. | |
| ४ | श्री. अजिंक्य पाघधरे<br>पालघर जिल्ह्यातील मौजे धाकटी डहाणू येथे महसूल गावं बाडापोखरण येथिल सर्व्हे नं.३७१ अ १/१/१/१ मधिल कांदळवन पाणथळचा नाश करून बांधलेल्या बेकायदा बांधकामबबाबत. | • या तक्रारी संदर्भात उपवनसंरक्षक डहाणू यांच्या दि.२८.०६.२०१९ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार या तक्रारी संदर्भात वनक्षेत्रपाल, बोईसन यांचे मार्फत चौकशी केली असता प्रस्तुत प्रकरणी खुरटी झुडपे ही कांदळवनाची असून त्याची वेढी साधारणत: ८ ते १० से.मी इतकी असल्याचे दिसून येते. सदर कांदळवन झुडपे ही ४ ते ५ असून बांधकामालगत इतर कुठल्याही भागात तोड केलेली दिसून येत नाही अथवा कांदळवन पाणथळाचा नाश केलेला दिसून आला नसल्याचे नमूद केले आहे.<br>• त्या अनुषंगाने सदरची तक्रार बंद करण्यात येत आहे. | तहसिलदार डहाणू (जिल्हाधिकारी पालघर) |
| ५ | श्री. धिरज परब:- भाईंदर पूर्व, जेसलपार्क येथे वसई खाडी किनारी कांदळवन, पाणथळ, सीआरझेड १ मध्ये मेरीटाईम बोर्ड ने जेट्टी, रॅम्प व पालिकेने रस्ता बांधकामे केले बाबत. | • या तक्रारीबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या दि.५.११.२०१८ रोजीच्या अहवालानुसार भाईंदर पुर्व भगातून जेसल पार्क रेल्वे समांतर नाला असून सदर नाला हा पुर्वीपासून अस्तीत्वात आहे सदर ठिकाणी नाल्यावर असलेले अडथळे काढून टाकण्यात आले आहेत तसेच नाले पक्या स्वरुपात बांधण्यात आलेले आहे. | तहसिलदार ठाणे (जिल्हाधिकारी ठाणे) |
| ६ | श्री. धिरज परब: - जेसलपार्क खाडी पात्रात व किनारी कांदळवन, पाणथळ मध्ये महापालिके कडून बेकायदा नाले बांधून सांडपाणी सोडणे तसेच कचरा, निर्माल्य प्लॅस्टिक व | • तसेच या तक्रारी संदर्भात ५ गुन्हे देखील दाखल केलेले आहेत.<br>• मेरीटाईम बोर्ड ने जेट्टी बांधकाम सर्व परवानग्या घेऊन करण्यात आले आहे असे उप आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी सांगितले.<br>• तसेच तहलिसदार ठाणे यांनी दिलेल्या Geo-Coordinates | |

| | | | |
|---|---|---|---|
| | अन्य साहित्य टाकून पर्यावरणाचा ऱ्हास | ची MRSAC वेबसाईद्वारा तपासणी केली असता सदर क्षेत्र हे वेटलॅन्ड यादीतील क्षेत्र नसल्याचे दिसते.<br>• तसेच श्री. धिरज परब यांच्या तक्रारींबाबत उप समितीच्या स्थळ पाहणीचा Part २ अहवाल अद्याप प्रलंबित असल्याने तहसिलदार ठाणे यांनी पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करु असे सांगितले. | |
| ७ | श्री. स्टॅलीन डी – दि.३१.०१.२०१९ Please act to stop illegal destruction of wetlands In Wadala /nearby areas | • या तक्रारी संदर्भात समितीने जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या दि.२५.०४.२०१९ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार सदर जागा वडाला रोडच्या कडेला तसेच भक्ती पार्क मोनोरेल स्टेशन खालून जाणाऱ्या रोडच्या दोन्ही बाजूस ठिक ठिकाणी दगड, माती, रॅबीटचे ढिग आढळून आले. सदर ढिग रस्त्याच्या कडेला असून त्याला लागून कांदळवन आहे. प्रत्यक्ष कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून येत नाही.<br>• सदर जागेवर स्लम (झोपडया) असल्यामुळे समितीने वन अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी, मध्यमुंबई व मुंबई पोलिस अधिकारी यांच्या मदतीने योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी मुंबई शहर |
| ८ | Well Wisher and Environment activist दि.२५.०३.२०१९ Dumping of C & D Waste, Cutting of Mangroves and Destruction of the Wetland in Village Kasheli Tal. Bhiwandi Dis. Thane. | • तहसिलदार ठाणे यांनी तक्रार मिळाली नाही असे सांगितले, त्या अनुषंगाने समितीने सदर तक्रार पुन्हा जिल्हाधिकारी ठाणे यांना पाठविण्यास समितीने सदस्य सचिवांना सांगितले.<br>• तथापि सदर तक्रारीबाबत तात्काळ कार्यवाही करुन ७ दिवसात अहवाल सादर करावा अशा सूचना देण्यात आल्या. | जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | श्री. स्टॅलिन डी<br>दि.१८.०३.२०१९ Continous reclamation and construction on Wetlands at Bhayanderpada Ghodbunder road by squarefeet Group. | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार ठाणे यांनी तक्रारदार श्री. स्टॅलिन डी यांच्या सोबत सदर जागेची स्थळ पाहणी पुढील आठवडयात करण्याचे ठरविले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत तक्रारदार यांच्या सोबत स्थळ पाहणी करुन कार्यवाहीचा अहवाल सदस्य सचिवांकडे सादर करण्याच्या सूचना तहसिलदार ठाणे यांना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे |
| १० | श्री. सुनिल अगरवाल<br>दि. २३.०३.२०१९<br>Save Karal Wetland-Birds Favourite Place. | • या तक्रारी संदर्भात SDO पनवेल यांनी MRSAC नकाशानुसार सदर जागा ही पाणथळ नाही असे निदर्शनास आले असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने सदरचे क्षेत्र पाणथळ नसल्यामुळे ही तक्रार बंद करण्यास समितीने सांगितले. | जिल्हाधिकारी रायगड |
| ११ | श्री. सुनिल अगरवाल व श्री. स्टॅलिन डी. २४.०३.२०१९ Drying up of Panje Wetland in Uran & debris dumping in Bhenkhal Wetland atlas नुसार पाणजे वेटलँड हे वेटलॅन्ड क्षेत्र नाही. | • या तक्रारी संदर्भात सदस्य सचिवांनी MRSAC नकाशाच्या पाहणी नुसार बेनखल येथे पाणथळ असल्याचे सांगितले.<br>• सदर ठिकाणी मोठया प्रमाणात डेब्रिज भराव होत असल्यामुळे समितीने जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींना तेथील भराव थांबविण्याच्या हटविण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br>• तसेच SDO पनवेल यांनी सदर जागेवरील रेक्लमेशन थांबवण्यात आले आहे असे सांगितले.<br>• सिडको यांना डेब्रिस काढण्याची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात यावे असे बैठकित निर्देश देण्यात आले. | जिल्हाधिकारी रायगड व सिडको |
| १२ | श्री. विनोद पुन्शी –<br>दि ०९.०५.२०१९ Wetland being filled up overnight | • या तक्रारी संदर्भात सदस्य सचिवांनी Wetland atlas नुसार सदरचे क्षेत्र हे वेटलॅन्ड क्षेत्र नाही असे सांगितले.<br>• परंतु सदर ठिकाणी कांदळवन असल्याने ही तक्रार | सिडको आणि आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | Near Indian Institute of Geo magnetism campus. | कांदळवन समितीकडे वर्ग करण्यास समितीने निर्देश दिले आहे. | |
| १३ | श्री. स्टॅलिन डी :-<br>दि.२७.०६.२०१९<br>Destruction of Wetland by CIDCO | • समितीने ही तक्रार सिडको यांना पाठविण्यात आली आहे. त्यानुसार सिडको यांचे प्रतिनिधी उपस्थित नसल्यामुळे पुढील बैठकीमध्ये सिडको यांना या तक्रारीबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी रायगड व सिडको |
| | सर्वसाधारण सूचना | पाणथळ क्षेत्रातील डेब्रिस टाकण्यासंदर्भात बराचश्या तक्रारी समितीसमोर येत असल्यामुळे समितीने संबंधित जिल्हाधिकारी, पोलिस यांनी उचित कार्यवाही करुन वाहन जप्त करुन संबंधित आरोपीकडून restoration करण्यास आवश्यक निधी उपलब्ध करुन शासनाकडे जमा करण्याबाबत सुचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी पोलिस |

सदर सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

सदस्य सचिव
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई.